# रासायनिक खतांच्या किंमती वाढणं अटळ!



खरं तर मागील एक वर्षापासून देवदर्शन आणि पारावरची बैठक कोरोनामुळे थोडीशी विस्कळीत झालेली असली तरी गणपत आणि संपतची सकाळची भेट कधीच चुकली नाही. अत्यंत महत्त्वाचे काम असेल किंवा बाहेरगावी असतील तरच त्यांची सकाळची भेट होत नाही. अन्यथा सकाळी देवदर्शन आटोपून संपत- गणपत एकमेकांना भेटून त्यातून गप्पांमधून ऊर्जा घेऊन दिवसभराच्या कामाला लागत असत. आजही गणपत देवदर्शन घेऊन पारावरच बसला होता. तेवढ्यात संपतही बाहेरून देवाचे दर्शन घेऊन गणपतजवळ येऊन बसला.

संपत गणपतच्या जवळ येऊन बसल्यावर गणपत म्हणाला, ''आरं संपा, माझ्या मनाला सतत एक प्रश्न सतावतो आणि तुला विचारू विचारू म्हणतो- या रासायनिक खतांच्या किंमती कोण ठरवतं? सरकार की कंपन्या? कारण औषधे, बियाणे किंवा इतर वस्तूंच्या किंमती त्या त्या कंपन्यांनी सांगितलेल्या किंमतीला आपण विकत घेतो. रासायनिक खतांवर तर कंपनीचं नाव असतं- जसं इफको, झुआरी, नर्मदा, दीपक इत्यादी इत्यादी. या कंपन्यांच्या खतांच्या किंमतींमध्येही फरक असतो. मग या किंमती जर कंपन्या ठरवितात तर मागील महिन्यात कंपन्यांनी खतांच्या किंमती वाढल्याचे जाहीर केल्यानंतर सरकारने त्या किंमती परत जागेवर कशा आणल्या? काहीच कळले नाही बघ संपा? मी तर पुरता घाबरलो होतो. अकराशेची गोणी अठराशेला म्हणजे फारच झाले. मात्र तेवढी युरियाची गोणीच स्वस्त राहिली होती. या किंमती कमी झाल्यानंतर तर मी ठरवलं होतं, जास्त युरिया वापरायचा पिकाला.''

यावर मात्र संपत मोठ्याने हसून म्हणाला, ''हो का गंपा? युरिया जास्त वापरणार होता? आहे का युरिया तेवढ्या प्रमाणात दुकानात? जास्त युरिया वापरून काय पिकाचे बंपर उत्पादन मिळतं काय? आरं, पिकाला खतांचा वापर करायला डोकं लागतं. त्यातलं शिक्षण आणि ज्ञान लागतं. घेतली कोणतीही खताची गोणी आणि वापरली पिकाला हे करून चालतं का गंपा? यामुळंच तर आपण आपल्या जमिनीची पार वाट लावली. पन्नास वर्षांपूर्वी रासायनिक खतं शेतात आली. खतं आली पण त्याच्या वापराचे ज्ञान मात्र मागेच ठेवलं. रासायनिक खतं टाकली की पिकं हिरवीगार व्हायची. विशेषत: युरिया वापरला की पीक नुसतं कांद्याच्या पातीसारखं हिरवंगार. त्यामुळे शेतकरी या मृगजळामध्ये फसला. रासायनिक खतांची उपलब्धता करून दिली तीही कमी किंमतीमध्ये. परंतु त्याबद्दलचे अज्ञान तसेच राहिले. काही दिवस चांगले गेले. परंतु हळूहळू खतांचा वापर करून जमिनी खराब होऊ

लागल्या. त्यामुळे जास्त खतांचा वापर करून जास्त उत्पादन घेण्याचा प्रयत्न सुरू झाला. यामुळे शेतकरी आणखी खोलात गेले. जमिनी पुऱ्या रासायनिक खतांच्या आहारी नेऊन ठेवल्या होत्या! नंतर हळूहळू खतांच्या किंमती वाढायला लागल्या. म्हणजे शेतात रासायनिक खतांचा वापर वाढत असताना खतांच्या किंमती वाढत होत्या. त्यामुळे उत्पादन खर्चात वाढ होऊ लागली. शेतकऱ्यांना स्वस्तात रासायनिक खते उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने लाखो कोटी रुपये अनुदान दरवर्षी दिले. परंतु नवीन धोरणानुसार अनुदान कपात सुरू झाली. पिकाला लागणाऱ्या मुख्य खतांमध्ये- म्हणजेच नत्र, स्फुरद, पालाश तसेच युरिया, फॉस्फेट आणि पोटॅश या खतांपैकी फक्त नत्र म्हणजेच युरिया खत शासनाने त्यांच्या नियंत्रणामध्ये ठेवले. म्हणजेच युरियाच्या किंमती ठरविण्याचा अधिकार शासनाने त्याच्याकडे ठेवला. बाकीच्या खतांवरचे निर्बंध उठविले. म्हणजे फॉस्फेट आणि पोटॅशयुक्त खतांची निर्मिती, विक्री तसेच त्यांच्या किंमती ठरविण्याचा अधिकार कंपन्यांना दिला. त्यामुळे या खतांच्या किंमती वाढतच गेल्या. एक वेळ अशी होती की नत्राची किंमत स्फुरद आणि पालाशपेक्षा जास्त होती. परंतु आज परिस्थिती मात्र फारच वेगळी आहे. नत्रापेक्षा स्फुरद आणि पालाशच्या किंमत कितीक पटीने वाढल्या आहेत.''

संपतने दिलेली ही सर्व सविस्तर माहिती गणपत मन लावून ऐकत होता. मध्येच गणपत म्हणाला, ''मग संपा, या खतांच्या वाढलेल्या किंमती मागे का घेतल्या शासनाने?''

यावर हसून संपत म्हणाला, ''हे बघ गंपा, रासायनिक खतांच्या किंमती वाढणे हे अटळ आहे. कारण स्फुरद, पालाशयुक्त खते तयार करण्यासाठी खत कंपन्यांना मोठ्या प्रमाणात कच्चा माल आयात करावा लागतो. कच्च्या मालाच्या किंमती जागतिक पातळीवर वाढल्या की खतांच्या किंमती वाढतात. कारण या खतांवरील शासनाचे निर्बंध काढलेले आहेत. आता नाही का पेट्रोल- डिझेलचे भाव कधीही वाढतात. काही वर्षांपूर्वी पेट्रोल- डिझेलचे भाव वर्षातून एकदा- दोनदा वाढविण्याचा विचार झाला तरीही समाज मोठ्या प्रमाणात संप करायचा. परंतु आज जागतिक बाजारामध्ये कच्च्या तेलाच्या भावामुळे पेट्रोल- डिझेलचे भाव ठरविण्याचे स्वातंत्र्य तेल कंपन्यांना दिलेले आहे. त्यामुळे त्यांचे भाव कधीही वाढतात. त्याचप्रमाणे खतांच्या बाबतीत आहे. फक्त युरिया खतच नियंत्रणात आहे. कारण युरिया खताचा वापर फार मोठ्या प्रमाणात आहे. आणि या खताच्या कच्च्या मालाच्या किंमती जास्त असल्यामुळे युरिया खत जास्त महाग पडते. म्हणून या खताच्या किंमती नियंत्रणात ठेवण्यासाठी भारत सरकार मोठ्या प्रमाणात अनुदान देते. खरं तर हीच गोष्ट चुकतेय. युरिया खतावरचे निबंध उठवले पाहिजे किंवा सर्वच खतांवर निर्बंध पाहिजे. आता काय होतंय, युरिया खतावर निर्बंध मोठ्या प्रमाणात, अनुदानामुळे स्वस्त खत. त्यामुळे या खताचा जास्त प्रमाणात वापर होऊन जमिनीची प्रत ढासळली आहे. पिकामध्ये नत्राचे प्रमाण वाढल्यामुळे हिरव्या- लुसलुशीत पिकांवर रोगकिडींचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे त्यांच्या नियंत्रणाचा खर्च वाढत आहे. शास्त्रज्ञ शासनाला युरियाच्या किंमती वाढवायला सांगत आहेत. पण शासन घाबरतंय. कारण युरियाच्या किंमती वाढल्या तर शेतकऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागेल. शासनानेही युरियावर देत असलेल्या मोठ्या प्रमाणातील अनुदानामुळे त्रस्त होऊन युरियाच्या गोणीचे वजन ४५ किलो केले. कमी वजनामुळे अनुदानात बचत होते. परंतु त्यामुळे शेतकऱ्यांना योग्य वेळी युरिया उपलब्ध होत नाही आणि अनेकदा जास्त भावाने दुकानदाराकडून युरिया विकत घ्यावा लागतो. दुसरीकडे नत्र- स्फुरद- पालाश या खतांच्या असंतुलित वापरामुळे जमिनीची पुरती वाट लागली आहे. म्हणजेच शासनाच्या या चुकीच्या धोरणामुळे शेतकऱ्यांची वाताहत होत आहे. गंपा, तू म्हणाला ना की मग खतांच्या वाढलेल्या किंमती शासनाने का मागे घेतल्या? तर त्याला दोन कारणे आहेत असे मला वाटते. एक तर आताच तू म्हणाला की, मिश्रखतांच्या किंमती एवढ्या मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे मी आता युरियाचाच जास्त वापर करणार. हेच ते एक मुख्य कारण. कारण अनेक शेतकऱ्यांनी युरिया स्वस्त आहे म्हणून त्याचा वापर केला असता. त्यामुळे मार्केटमध्ये आधीच युरियाची

कमतरता आणि त्यात आणखी किंमत वाढली असती तर शासकीय खतपुरवठा यंत्रणा पूर्णपणे उघडी पडून शासनाची नाचक्की झाली असती. ही गोष्ट लक्षात आल्यानंतर शासनाने खत किंमतीतील वाढ मागे घेतली असे वाटते. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे आता शेती आणि शेतकरी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अत्यंत बिकट परिस्थितीतून जात आहे. शेतीमध्ये वाढलेला खर्च आणि शेतीमालाचे बाजारभाव यांचा ताळमेळ करून खतांच्या किंमतीची त्यात आणखी भर पडली असती तर मोठा अनर्थ झाला असता. ही बाबही शासनाच्या उशिरा लक्षात येऊन घाईघाईत हा निर्णय मागे घेतला. परिस्थिती सुधारल्यानंतर मिश्रखतांच्या किंमतीमध्ये वाढ होणे अटळ आहे. कारण आता केंद्र सरकार कोणालाही अनुदानाचे चॉकलेट कायमस्वरुपी देण्याच्या मानसिकतेमध्ये नाही. त्यामुळे खतांच्या कमी केलेल्या किंमती वाढतीलच. ''

यावर मात्र गणपत चिडून म्हणाला, ''मग संपा मला तर सरकारला हे सांगणं आहे की फक्त मिश्रखतांचे अनुदान बंद करण्याऐवजी सर्वच खतांचे अनुदान बंद करा. युरियाला सुद्धा का देता अनुदान? आम्ही आमच्या पद्धतीने ज्या भावात कंपन्या खत देतील त्या भावात घेऊ, पाणी घेऊ, औषधे घेऊ. आम्हाला शेती करताना प्रत्येक वस्तूला नियंत्रण नाही मग आमचा शेतमाल तयार झाल्यावर त्याच्या किंमतीवर नियंत्रण का? त्यालाही मिळाला पाहिजे वाढलेल्या महागाईनुसार बाजारभाव! आयात-निर्यातीवर बंधन नको. आज कोरोनामध्ये शेतकऱ्याने त्याची शेती पिकविण्याचे बंद केले नाही. पूर्ण देशाला घरात बसून खाऊ घातलं. देशाच्या अर्थव्यवस्थेला आधार दिला. परंतु संपा, शासन मात्र आजही शेती आणि शेतकऱ्यांकडे गंभीरतेने बघत नाही.''

खरं तर गणपत सर्व योग्यच बोलत होता. सर्व शेतकऱ्यांच्या भावना त्याच्या तोंडून बाहेर येत होत्या. परंतु या विषयावर चर्चा वाढविण्याऐवजी संपत म्हणाला, ''चल गंपा, नुसती चर्चा करून प्रश्न सुटणार नाहीत. त्यासाठी कष्टच करावे लागतील. चल लागू आपल्या कामाला...''

**(सौजन्य : पूर्वा कृषिदूत परिवार)** ■

## लेखकांना आवाहन...

**'पूर्वा कृषिदूत'** परिवाराशी आपण गेली काही वर्षे लेखक या नात्याने निगडित आहात, याचा मन:पूर्वक आनंद वाटतो. (सध्या आपण प्रस्तुत मासिक डिजिटल स्वरुपात प्रकाशित करीत आहोत. ही बहुरंगी ऑनलाईन आवृत्ती आपणास कशी वाटते, ते जरुर कळवा.)

आपल्या लेखासोबत आपला सविस्तर पत्ता मोबाईल नंबरसह नमूद करावा ही विनंती. तसेच आपला पासपोर्ट आकाराचा फोटोही जरुर पाठवावा. आपले लेखन सहकार्य असेच लाभत राहील याची खात्री आहेच; आपल्या नवीन उपक्रमांना तसेच व्यक्तिगत, व्यावसायिक संकल्पांना आमच्या हार्दिक शुभेच्छा.

-: आमचा पत्ता :-

पूर्वा कृषिदूत, एम-११३, एम.आय.डी.सी., अंबड, नाशिक- ४२२०१० (महाराष्ट्र).
email:poorvakrushidoot@gmail.com

**- संपादक, 'पूर्वा कृषिदूत'**